# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र :३४३/२०२२/अहमदनगर**

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| श्री. शंकर रेवजी तांबे,<br>रा. मु. पो. म्हसणे सुलतानपुर,<br>ता. पारनेर, जि. अहमदनगर. | सहायक गटविकास अधिकारी,<br>पंचायत समिती, पारनेर, ता. पारनेर,<br>जि. अहमदनगर. |

**सुनावणी दिनांक २२/०२/२०२४**

तक्रारदार यांनी दिनांक २२/०७/२०२२ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये दिनांक २२/०२/२०२४ रोजी आयोजित सुनावणीसाठी तक्रारदार ऑनलाईन उपस्थित असून विद्यमान जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

२) तक्रारदार यांनी दिनांक २२/०७/२०२२ रोजीच्या तक्रार अर्जात नमुद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयीन कामकाजाची पाहणी करायची बाबत अर्ज कार्यालयास दिला होता पण त्यांनी पाहणी करण्यास नाकारले.

३) सुनावणीवेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, तक्रारदार यांचा दि. २४/०६/२०२२ च्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. ११/०७/२०२२ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कार्यालयीन कामकाज पाहणी करणेबाबतची तरतुद उपलब्ध नसलेने तुम्हास कार्यालयीन कामकाज पाहणी करणेस परवानगी देता येणार नाही. असे वस्तुस्थितीदर्शक उत्तर कळविलेले आहे.

४) सुनावणीदरम्यानचा युक्तीवाद व प्रस्तुत प्रकरणी आयोगास सादर केलेले अभिलेख विचारात घेता, माहितीच्या अर्जात केलेली "कामकाज पाहणी करणे" हा विषय माहिती अधिकार अधिनियमात अभिप्रेत नाही. माहिती संदर्भातील कागदपत्र व इतर माहिती मागणीची विनंती करता येवू शकेल. याबाबत अवलोकन करण्याचे अधिकार आहेत. सबब, जन माहिती अधिकारी यांची कार्यवाही योग्य आहे. त्यामुळे सदरची तक्रार पुढील चौकशी योग्य नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत तक्रार क्रमांक ३४३/२०२२/अहमदनगर निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

जावक क्र आ-२४०८ 11 SEP 2024